पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 21/01/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक 21/01/2020 रोजी ठाणेदार पो. स्टे. केळवद सपोनि श्री. सुरेश मट्टामी यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, छिंदवाडा ते नागपूर जाणाऱ्या हायवे क्र. 547 वरील जैतगड शिवारातुन एमपी–09/एचएफ–9892 क्रमांकाच्या ट्रक मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन सपोनि श्री. सुरेश मट्टामी हे पो.स्टे. केळवद स्टाफसह छिंदवाडा ते नागपूर जाणाऱ्या हायवे क्र. 547 वरील जैतगड शिवारात नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना दिनांक 21/01/2020 चे रात्री 02:00 वा. दरम्यान एक एमपी–09/एचएफ–9892 क्रमांकाच्या 10 चक्का ट्रक भरधाव वेगाने येतांना दिसला. ट्रक चालकास वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन जैतगड शिवारात नाकाबंदीचे ठिकाणी वाहनास थांबवुन पोलिस स्टाफच्या मदतीने पाहणी केली असता सदर ट्रकच्या मागील डाल्यामध्ये 42 गाई बैल गौरे गौवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. वाहनातील चालक आरोपी नामे– 1) ईस्माईल बाबु खॉ, वय 55 वर्ष, रा. सिंधाखाल मोहल्ला वार्ड क्र. 6, सारंगपुर जि. राजगड(म.प्र), 2) नसीब बसीर खॉ, वय 30 वर्ष, रा. मुकीरवाडी वार्ड क्र. 15, सारंगपुर जि. राजगड (म.प्र), 3) एहसान साखीर अली, वय 22 वर्ष, रा. दांडिया वाडी वार्ड क्र. 15, सारंगपुर जि. राजगड (म.प्र) व 4) आझाद नुर खॉ, वय 30 वर्ष, रा. पिंजरा भाखल, वार्ड क्र. 6, सारंगपुर जि. राजगड (म.प्र) हे सदरचे जनावरे ही कत्तलीसाठी वाहनात भरुन घेवुन जात होते. एकुण 42 बैल गाई गौरे गौवंश किमती 4,20,000/– रु., एक मपी–09/एचएफ–9892 क्रमांकाच्या ट्रक किमती 15,00,000/–रुपये असा एकुण कि. 19,20,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 08/2020 कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. 1960 सह कलम 5 (अ) 9 महा. प्राणी सरंक्षण अधिनीयम सहकलम 34 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि श्री सुरेश मट्टामी हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, सफौ मोरेश्वर नांदेकर, पोहवा दिलीप ठाकरे, नापोशी राजेन्द्र रेवतकर, पोशि सचिन येळकर, चानापोशि गुणेश्वर डाखोळे यांनी केली आहे.



# पाण्यात बुडाल्याने मृत्यू

पो. स्टे. कोंढाळी : – अंतर्गत 8 कि.मी. अंतरावर मौजा पंचधार येथे दिनांक 05/01/2020 चे 15.41 वा. दरम्यान अशोक दमडुजी केवटे, वय 36 वर्ष, रा. पारडी सारवाडी, ता. कारंजा, जि. वर्धा हा दारूच्या नशेत घरून निघुन गेला. त्याचे प्रेत तलावाच्या पाण्यात बुडुन मृत स्थितीत आढळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गोपाल दमडुजी केवटे, वय 50 वर्ष, रा. पारडी सारवाडी, ता. कारंजा जि. वर्धा यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस शिपाई श्री. नितेश डाकीरमारे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर